# संत चोखामेळा

प्रकाशित:

रत्नाकर वाणी

पुनरारंभ

© पुनरारंभ

website: http://www.rajratna.co.in Email: ratnakar.wani@rajratna.co.in

# संत चोखामेळा

संत चोखामेळा एक अविरत भक्ति रसाचे प्रतिक. पंढरीच्या पांडूरंगावर त्यांची अपार भक्ति, अपार श्रध्दा होती. त्यांचा जन्म नीच कुळात झाला होता. मंगळवेढा ही त्यांची जन्म भुमि.

चाखोबांच्या अयोजिन जन्माबाबत एक विलक्षण कथा सांगितली जाते. कोरेगावातील विठ्ठल भक्त पाटलांनी आपल्या बागेतील सव्वाशे आंबे येसकराबरोबर पंढरपूरच्या पंढरीरायाला पाठविले. पंढरपूर दोन कोसावर असतांना एका वृध्द ब्राम्हणाने त्यांना अडवून काही खायला मागितले. यावर सुदामा येसकर म्हणाला, “हे ब्रम्हणा, मी अंत्यज व आपण द्विज मी आपणास कसे व काय खायला देउ. माझ्या डोक्यावर असलेले आंब्याचे ओझे देखिल माझे नाही. त्यामुळे मी आपणास काही खायला देउ शकत नाही. मला माफ करा.” त्यांचे सोबत असलेली सुदामाची पत्नी सावित्री बाईला वृध्द ब्राम्हणाची दया आली आणि तिने त्यातला एक आंबा वृध्द ब्रांहणास चोखावयास दिला. ब्राम्हणाने आनंदाने आंबा चोखला परंतु आंबट लागल्याने लगेच परत केला. चोखलेला आंबा परत पाटीत ठेवणे अयोग्य होते म्हणून तो आपल्या ओटीत ठेवला, पंढरपूरला पोचल्यावर बडव्यांनी सर्व आंबे मोजले तेव्हा कमि भरलेल्या आंब्याची गोष्ट सावित्रीबाईनी बडव्यांना कथन केली व ओटीतला आंबा दाखवू लागली. परंतु ओटीत आंब्याच्या ऐवजी बाळ नजरेस पडले. देवाने आंबा चोखला व बाळरूपी प्रसाद दिला म्हणून बाळाचे चोखा मेळा असे नामकरण केले.

चोखोबा व त्यांची पत्नी सोयरा दोघेही विठ्ठल भक्त. त्यांची पंढरपूरला पांडूरंगाच्या दर्शनाला जाण्याची तीव्र इच्छा होती. संत नामदेव महाराजांची दिंडी पंढरीच्या दर्शनाला चालली असता त्यांनी त्यामध्ये सामिल होण्याची इच्छा त्यांच्यापुढे प्रगट केली. दिंडीतील इतर भक्तांनी ते नीच कुळातील असल्याचा आक्षेप घेत नाकारली. परंतु नामदेवांनी सर्वांना समजाविले, “बाबांनो जातपात ही देवाने केलेली नाही तर स्व स्वार्थासाठी मानव निर्मित आहे. देवापुढे सर्व सारखे. देव हा भावाचा भक्तिचा भुकेला आहे. उच नीच नाही तिथे भगवंत | जिथे भावभक्ती देखोनिया || मग आपण हा भेदभाव का मानावा.”

त्यांना नामदेव महाराज गुरू भेटले. नामदेवांनी आपल्याला कृतार्थ केले म्हणून चोखोबा म्हणतात,

“धन्य धन्य नामदेव | माझा निरसला भेद |”

परंतु पंढरपुरला बडव्यांनी त्यांना नीच कुळातले हिणवित मंदिरात प्रवेश नाकारला . ते विना दर्शन घरी परतले . या वेळी चोखोबा म्हणतात,

“उस होये डोंगा, परी रस नोहे डोंगा |
नदी होये डोंगी, परी जल नोहे डोंगे |
कमान होये डोंगी, परी तीर नोहे डोंगा |
चोखा होये डोंगा, परी भाव नोहे डोंगा |

देव सर्वांच्या अंगी आहे तो फक्त जाणावा लागतो .

चोखोबांच्या कडून मिळालेल्या प्रेरणेने यास अनुसरून सोयराचा पण एक अभंग आहे . सोयरा म्हणते .

अवघा रंग एक झाला, रंगी रंगला श्रीरंग |
मी तू पण गेले वाया, पाहता पंढरीचा राया |
नाही भेदाचे ते काम, पळून गेले क्रोध काम |
देही असूनी तुही देही, सदा समधीया पाठी |
पाहा पाहारे गेले दूरी, म्हणे चोखियाची महारी |

पंढरीचा पांडूरंग त्यांच्या वर प्रसन्न झाला . रात्री त्यांच्या झोपडीत जाउन त्यांना दर्शन दिले व गळयातील रत्नहार काढून दिला . देवाच्या गळयातील हार दिसेनासा झाला म्हणून बडव्यांनी त्याच्या वर चोरीचा आरोप करित त्यांना मारू लागले . शिक्षा म्हणून चोखोबांना बैल जोडीला बांधुन बैल जोडी हाकू लागले . पण पांडूरंगाची दया एवढे मारून देखिल बैलं जागची हालेनात .

यावेळी पांडूरंगाचा धावा करित ते म्हणाले,

"धाव घाली विठू आता चालू नको मंद |
बडवे मज मारिती ऐसा तरी काय अपराध
विठ्ठलाचा  हार तुझ्या कंठी कसा आला
शिव्या देउनी म्हणती महारा देव बाटविला
कर जोडोनी चोखा विनवितो देवा
बोलिलो उत्तरे परी राग नसावा.

आपल्या अभंगात पांडूरंगाची क्षमा मागत ते म्हणतात. हे विठ्ठला मला माफ कर. खरेतर मी तुझ्या पायाशी यायला पाहिजे. पण मी तुलाच येथे बोलवितो आहे. मला क्षमा कर." त्यांच्या हाकेला पांडूरंग धाउन आले व त्यांना सोडविले.

एकवेळा पांडूरंग ब्राम्हणाच्या वेशात सोयराच्या दारी भिक्षा मागण्यास आले. "आम्ही नीच कुळातील. तुम्हास कशी भिक्षा देणार?" असे सोयरा म्हणता मी फार भुकेला आहे काहीतरी दे असा अट्टाहास पांडूरंगानी धरला तेव्हा सोयराने त्यांना भाकरीची भिक्षा दिली. ब्राम्हण रूपी पांडूरंग प्रसन्न झाले जे काही मागायचे ते माग म्हणाले. सोयराने पुत्र प्राप्तीची इच्छा केली. ब्राम्हणाने ताटातील भाकरीचा तुकडा प्रसाद म्हणून दिला. कृपा प्रसादे सोयराची इच्छा पूर्ण झाली. सोयरा गर्भवासी झाली. दिवस भरले. बाळंतपण करायला चोखोबा आपल्या बहिणीला बोलावण्यास गेले. त्याच वेळी इकडे सोयरा बाळंत झाली. नणंदेच्या वेशात पांडूरंग अवतरले व तिचे बाळंतपण केले. पुत्र रत्न जन्मा आले त्याचे नाव कर्म मेळा ठेविले. बाळ बाळंतीण सुखरूप झाले.

नंतर चोखोबा बहिणीसह परतले तेव्हा त्यांना कळले की, पांडूरंग येउन गेलेत व सोयराचे बाळंतपण करून गेले

या संदर्भात विठ्ठलाची महती सांगणा–या अभंगातील काव्य पंक्तीत म्हटले आहे

लेकरांची सेवा केलीस तू आई

कसा पांग फेडू कस होउ उतराई

तुझ्या उपचारा जगी तोड नाही

ओवाळीन जीव माझा सावळे विठाई

जन्मभर पूजा तुझ्या पाऊलांची

माऊलीच मुर्ती विठ्ठलाची

संत चोखोबांच्या मते विटाळ म्हणजे, जो टाळता येत नाही तो विटाळ. ते आपल्या अभंगात म्हणतात,

जन्मता विटाळ, मरता विटाळ |

चोखा म्हणे विटाळ आदिअंति ||

आदिअंति अवघा, विटाळ साचला |

सोवळा तो झाला कोण न कळे ||

चोखा म्हणे मज नवल वाटते |

विटाळा परते आहे कोण ||

बालक जन्मास आल्यास विटाळ म्हणून १० दिवस सोयरं पाळतात. त्यामागे खरे कारण तर नवजात बालकास संसर्ग होउ नये हाच उदात्त हेतु असतो. तसेच मृत्युउपरांत विटाळाचे कारण पुढे करित १० दिवस सुतक पाळले जाते. खरेतर मृतदेहापासून किंवा त्याच्या स्पर्शाने जंतुसंसर्ग टाळावा यासाठी मृतदेहाच्या नाका तोंडात कानात कापसाचे बोळे लावतात. यात कसला आला विटाळ.

स्त्रीयांचे बाबतीत मासिक धर्म पालन म्हणजे शरीर शुध्दीच होय. अशाप्रकारे मानव शरीर विटाळाने ग्रासले आहे. जर जन्मापासून मृत्युपर्यंत विटाळ आहे तर त्यात अशौच काय मानायचे? चोखोबा नवल करित म्हणतात, असा कोणता माणूस विटाळा वाचून सोवळा आहे.

चोखोबाची पत्नी सोयराजी ही स्वयंप्रज्ञा स्पष्टवक्ती होती. तिच्याकडे भगवद्भक्ताची आर्तता होती. विठ्ठलनामाचा महिमा सांगतांना ती म्हणते, "विटाळाचे होते जाळे | तुटले बळे नामाच्या " केवळ नामाच्या घोषाने विटाळाचे जाळे तुटले. देहाचा विटाळ हा निसर्गदत्त आहे तो कोणाला चुकला नाही. त्याची अपरिहार्यता वर्णन करतांना ती खडे बोल सुनावते म्हणते.

देहासी विटाळ म्हणती सकळ |
आत्मा तो निर्मळ शुध्द बुध्द |
देहीचा विटाळ देहीच जन्मला |
सोवळा तो झाला कवण धर्म |
विटाळा वाचोनी उत्पत्तीचे स्थान |
कोण देह निर्माण नाही जगी ||

विटाळ म्हणता तो फक्त देहालाच आहे पण आत्मा तर शुध्द व बुध्दीवान आहे. विटाळ अर्थात ज्यास आपण अशौच समजतो तो जन्मजातच आहे. असा कोणता मानवप्राणी आहे ज्याचे अंगी विटाळ नाही. अशौच मानवाचे उत्पत्ती स्थान आहे. याशिवाय कोणता मानव देह निर्माण तरी झालाय का ?

शेवटी परिस्थितीनुसार संत चोखोबांना मंगळवेढयाच्या कील्ल्याच्या तटबंदीवर मजूराचे काम करावे लागले. काम करतांना देखिल मुखाने विठ्ठल नामाचा घोष चालूच होता.

तो एकादशीचा दिवस होता. दुर्दैवाने काम करतांना कील्ल्याची तटबंदी ढासळली. त्यात अनेक मजूरांसमवेत यांचा अंत झाला. त्यांचा शोध घेतांना फक्त अस्थिच सापडली परंतु ती चोखोबांची ओळखायची कशी. मरणउपरांत देखिल फक्त त्यांच्याच अस्थिंमधून "विट्ठल विट्ठल" असा नामाचा गजर ऐकू येत होता. ही अस्थि चोखोबांची असे जाणून ती सर्व अस्थि नामदेवरायांनी पंढरीत आणली. चंद्रभागेत विसर्जन केले व तिथे त्यांची समाधी बांधली.

देव चोहिकडे कोंडियला | चोखा म्हणे देव भावा चा बांधला |